मागणी क्रमांक आर-१, लेखाशिर्ष "२२१०३०६५" अंतर्गत अनुशेषांर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रें बांधकामासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी निधी मंजुर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय, क्रमांकः संकीर्ण २०१७/प्र.क्र.१८७/आरोग्य ३

१० वा मजला, संकुल इमारत,
जी.टी. रुग्णालय आवार, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : १६ फेब्रुवारी, २०१८.

वाचा :

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांकः अर्थसं-२०१७/प्र.क्र. ७५/अर्थ-३, दिनांक १८.०४.२०१७.
२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांकः अर्थसं-२०१७/प्र.क्र. ९४/अर्थ-३, दिनांक ३०.०६.२०१७.
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण२०१७/प्र.क्र.१८७/आरोग्य ३ दि.११ ऑक्टोंबर, २०१७
४) आरोग्य सेवा संचालनालय, पत्र क्रमांकः संआसे/कक्ष-७अ/टे-१/प्रा.आ.केंद्र अनुदान वितरण/जि.प.नांदेड/११०/२०१८, दिनांक १६.०१.२०१८.

प्रस्तावना :

सन २०१७-१८ या वर्षाकरीता अनुशेषांतर्गत मंजूर असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे यांच्या बांधकामासाठी मुख्यलेखाशिर्ष "२२१०३०६५" याखाली मार्च, २०१७ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये रुपये ५९५७.७८ लक्ष नियतव्यय मंजूर करण्यात आलेला आहे. सदर निधी पैकी शासन निर्णय दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ अन्वये मंजूर निधीच्या ७० टक्केच्या मर्यादेत एकूण रु. ४१७०.४४ लक्ष निधी मंजुर करण्यात आला आहे. त्यापैकी शासन संदर्भ क्र ३ अन्वये रु. ४०६९.९७ लक्ष निधी वितरीत करण्यात आला असून रु. १००.४७ लक्ष इतका निधी मंजुर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती याबाबत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णय :

संदर्भाधीन अनुक्रमांक-१ येथील शासन परिपत्रकान्वये “महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०१७” (महाराष्ट्र विनियोजन (लेखनुदान) अधिनियम, २०१७ यांच्या अनुसूचीच्या स्तंभ ४ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रकमांसह) यास महाराष्ट्र विधानमंडळाने मंजुरी दिली असून, महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी त्यास अधिसंमती दिलेली आहे आणि ते २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ म्हणून महाराष्ट्र राजपत्र असाधारण भाग-४, दिनांक १५.०४.२०१५ अन्वये प्रसिध्द करण्यात आला

आहे. त्यास अनुसरुन सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पीय निधीच्या ७० टक्केच्या मर्यादेत निधी वितरीत करण्यास अनुमती दिलेली आहे.

२. सन २०१७-१८ या वर्षाकरीता अनुशेषांतर्गत मंजूर असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे यांच्या बांधकामासाठी मुख्यलेखाशिर्ष "२२१०३०६५" या खाली मार्च, २०१७ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये रुपये ५९५७.७८ लक्ष नियतव्यय मंजूर करण्यात आलेला आहे. सदर निधी पैकी शासन निर्णय दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ अन्वये मंजूर निधीच्या ७० टक्केच्या मर्यादेत एकूण रु. ४१७०.४४ लक्ष निधी मंजुर करण्यात आला आहे. त्यापैकी शासन संदर्भ क्र. ३ अन्वये रु. ४०६९.९७ लक्ष निधी वितरीत करण्यात आला असून रु. १००.४७ लक्ष इतका निधी शिल्लक आहे. सह संचालक आरोग्य सेवा यांनी मागणी केल्यानुसार व लोकप्रतिनिधीच्या मागणीनुसार जिल्हा परिषद नांदेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र बांधकाम दुरुस्तीच्या कामासाठी शिल्लक निधीच्या मर्यादेत खालील प्रमाणे निधी मंजुर करण्यात येत आहे.

अ.क्र.	आरोग्य संस्थाचे नाव	निधीची मागणी	काम
१	प्राथमिक आरोग्य केंद्र बारुळ ता. कंधार	रु. ३७.०० लक्ष	कर्मचारी निवासस्थान बांधकाम
२	उपकेंद्र कौठा ता. कंधार	रु. ७.४० लक्ष	दुरुस्ती व रस्ता बनविणे
३	उपकेंद्र टाऊन खेडा ता. कंधार	रु. ७.४० लक्ष	किरकोळ दुरुस्ती व परिसर सुधारणा व पेव्हर ब्लॉक बसविणे
४	उपकेंद्र दत्तमांजरी ता. माहुर	रु. ११.१० लक्ष	दुरुस्ती व परिसर सुधारणा व पेव्हर ब्लॉक बसविणे
५	प्राथमिक आरोग्य केंद्र वाई ता. माहुर	रु. १४.८० लक्ष	किरकोळ दुरुस्ती, परिसर सुधारणा व कॉक्रेटीकरण
६	प्राथमिक आरोग्य केंद्र वाई ता. माहुर	रु. १४.८० लक्ष	परिसर आवारात पेव्हर ब्लॉक बसविणे.
७	उपकेंद्र लखमापूर ता. माहुर	रु.७.४० लक्ष	किरकोळ दुरुस्ती व परिसर सुधारणा व पेव्हर ब्लॉक बसविणे
	एकूण	रु. ९९.९० लक्ष	

<u>अटी व शर्ती</u> :-

१) कामासाठी निविदा मागविण्याआधी सदर कामास जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभागातील सक्षम अधिकाऱ्यांची तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक राहील.

२) उपरोक्त १ ते ७ कामाची निविदा काढतांना प्रत्येक कामाची स्वतंत्रपणे निविदा काढण्यात यावी.

३) कामासाठीच्या जागेची उपलब्धता, योग्यता व जागा पुरेशी आहे किंवा नाही याबाबतची खात्री संबंधित आरोग्य संस्था प्रमुखांनी करावी.

४) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/तां.क.१ दि. १० जानेवारी,२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

५) उपरोक्त कामे सदर रक्कमेत पूर्ण होतील यांची दक्षता घ्यावी.

३. सदर प्रस्तावावरील खर्च मागणी क्रमांक- आर-१, मुख्यलेखाशिर्ष "२२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६- सार्वजनिक आरोग्य, ८००- इतर खर्च, प्रादेशिक असमतोल दूर करण्याकरीता योजना- स्थानिक क्षेत्रातील योजना (राज्य योजना), (०१)(०७) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम १८७ अन्वये योजनांतर्गत योजनांकरिता अनुदान (२२१० ३०६५), ३१ सहायक अनुदान (वेतनेतर)" याखालील सन २०१७-१८ करिता उपलब्ध असलेल्या निधीमधून खर्ची टाकण्यात यावे.

४. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील सर्व नियंत्रक अधिकाऱ्यांना असे कळविण्यात येते की, उपरोक्त मंजुर करण्यात आलेल्या निधीचे वाटप करण्यात यावे व मंजुर करण्यात आलेला सदर निधी नियमानुसार खर्च करण्यात यावा व त्यापेक्षा अधिक खर्च होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

५. सदर शासन निर्णय, वित्त विभागाचे शासन परिपत्रक, क्रमांकः अर्थसं -२०१७/प्र.क्र. ९४/अर्थ-३, दिनांक ३० जुन, २०१७. मान्यतेस अनसरुन निर्गमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१५१८२०२४१२१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2018.02.16 14:58:16 +05'30'

(रो.दि. कदम पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र १/ २ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरीक्षा), मुंबई/ नागपूर.

२. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.

३. जिल्हा कोषागार अधिकारी. नांदेड
४. सह संचालक, रुग्णालये (जिल्हास्तर), आरोग्य सेवा, मुंबई.
५. सर्व उप संचालक, आरोग्य सेवा मंडळे.
६. जिल्हा आरोग्य अधिकारी नांदेड.
७. नियंत्रक, लेखा व लेखापरीक्षा, आरोग्य सेवा संचालनालय, पुणे.
८. वित्त विभाग (अर्थसं ३), मंत्रालय, मुंबई.
९. सार्वजनिक आरोग्य विभाग (कार्यासन- अर्थसंकल्प/ आरोग्य ३-अ, आरोग्य ४), मंत्रालय, मुंबई.
१०.निवडनस्ती (आरोग्य ३).